# सुचना

बृहतसुचीवरील पात्र अर्जदारांना कळविण्यात येते कि, अतिरीक्त क्षेत्रफळापोटी विकासकांकडून प्राप्त झालेल्या सदनिकांपैकी ३०० चौ.फुट पेक्षा कमी क्षेत्रफळाच्या सदनिका मागणीअभावी वितरणाशिवाय पडून आहेत. बृहतसुचीवरील पात्र अर्जदारांपैकी जे अर्जदार सदर सदनिका घेण्यास इच्छुक असतील त्यांना अनुज्ञेय क्षेत्रफळ (३०० चौ.फुट वगळता) अतिरीक्त क्षेत्रफळाकरीता वितरीत सदनिकांपैकी तुलनात्मकरीत्या जास्त असणारा शिघ्रसिद्धगणक दराच्या (रेडी रेकनर )१२५% दर आकारणी करून वितरण करणेबाबत मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या सुचना आहेत.

मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी दिलेल्या सुचनांनुसार दि.२८/१२/२०२३ रोजी संगणकीय प्रणालीद्वारे सदर गाळ्यांचे वितरण करावयाचे असल्याने वरीलप्रमाणे नमुद वितरणाकरीता इच्छुक मुळ भा/र, अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सद्यस्थितीत असे एकुण ३६ सदनिका संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करावयाच्या आहेत. याकरीता इच्छुक अर्जदारांकडून २:१ या प्रमाणात १८ पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास त्यांच्या निष्कासन सुचनेच्या दिनांकानुसार जेष्ठता निश्चित करून सदनिकांचे वितरण करण्यात येईल. याकरीता दि.२७/१२/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंतचे प्राप्त अर्ज विचारात घेण्यात येतील.

उपमुख्य अधिकारी/ पु.गा

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ